# ४. सुहासिआइं

राजा सातवाहन हा हाल कवी या नावानेही ओळखला जातो. दुसरे किंवा तिसरे शतक हा त्याचा काळ मानला जातो. सातवाहन हे एका राजघराण्याचे नाव असून ते राजे प्रतिष्ठानात (सध्याचे पैठण) राज्य करीत होते. त्या राजांचा प्राकृत भाषांकडे फार ओढा होता. त्यांनी प्राकृत प्रसारासाठी प्रयत्न केले. ते अंतःपुरात प्राकृतमध्ये बोलत असे म्हणतात. हाल नावाच्या सातवाहन राजाने प्राकृतमधील सुभाषितरत्नांचा संग्रह केला आणि तोच सरस व वाचनीय काव्यसंग्रह 'गाथासप्तशती' या नावाने ओळखला जातो. या संग्रहात त्याने स्वतः रचलेल्या गाथाही आहेत. गाथासप्तशतीच्या प्रारंभी मंगलाचरणात त्याने सूर्याला नमस्कार केला आहे. त्यावरून तो सूर्योपासक होता असे वाटते. हेमचंद्र आणि मेरुतुंग यांनी हाल हा नागार्जुनाचा शिष्य होता असे म्हटले आहे.

'गाथासप्तशती' हे शृंगाररसप्रधान असे मुक्तक काव्य आहे. ग्रामवासियांच्या जीवनात हरघडीस घडणारे प्रसंग येथे चित्रित केले आहे. निसर्गचित्रण, लोकव्यवहार व शाश्वत मानवी भावनांचे गोड आविष्कार रंगविणाऱ्या गाथा विलोभनीय व आनंद देणाऱ्या आहेत. नीती व व्यवहार याविषयी अनेक अर्थपूर्ण व रेखीव सुभाषिते गाथासप्तशतीत मोत्याप्रमाणे विखुरलेली आहेत. हालाने प्राकृतमधील सर्वश्रेष्ठ कवींच्या उत्कृष्ट काव्यातून उत्तमोत्तम सातशे गाथा निवडून त्यांचा संग्रह केला आहे. त्या संग्रहाला पूर्वी गाथाकोश असे म्हणत असत. मूळ गाथाकोश हा सुमारे १००० गाथांचा संग्रह असावा व पुढे कमी होत होत ७०० गाथांचा संग्रह राहिला जो आज विद्यमान आहे. उपमा, रूपक इत्यादी अलंकारांनी नटलेल्या या गाथा महाराष्ट्री प्राकृतात आर्या छंदात रचलेल्या आहेत.

भारतीय सांस्कृतिक जीवनावर सुभाषितांचा फार प्रभाव आहे. मानवी वृत्ती, सांस्कृतिक मूल्ये यांचे वास्तव दर्शन एखाद्या उपमा दृष्टांताच्या माध्यमातून अत्यंत पारिणामिकरित्या सुभाषितांमध्ये चित्रित केलेले असते. त्यांच्या रचना सत्यवचनांवर आधारित असून अल्पाक्षरे असतात व त्यांचा अर्थ विशाल असतो. त्यांचा उपयोग वैश्विक पातळीवर होत असतो.

१) तुंगो च्चिअ होइ मणो मणंसिणो अंतिमासु वि दसासु।
अत्थमणम्मि वि रइणो किरणा उद्धं चिअ फुरंति।।

२) फलसंपत्तीअ समोणआइँ तुंगाइँ फलविपत्तीए।
हिअआइ सुपुरिसाणं महातरूणं व सिहराइं।।

३) जाएज्ज वणुद्देसे कुज्जो वि हु णीसाहो झडिपत्तो।
मा माणुसम्मि लोए ताई रसिओ दरिद्दो अ।।

४) विण्णाणगुणमहग्घे पुरिसे वेसत्तणं पि रमणिज्जं।
जणणिंदिए उण जणे पिअत्तणेणावि लज्जामो।।

५) छज्जइ पहुस्स ललिअं, पिआइ माणो, खमा समत्थस्स।
जाणंतस्स अ भणिअं, मोणं च अआणमाणस्स।।

६) सुअणो ण कुप्पइ व्विअ, अह कुप्पइ विप्पिअं ण चिंतेइ।
अह चिंतेइ ण जंपइ, अह जंपइ लज्जिओ होइ।।

७) कीरंती व्विअ णासइ उअए रेह व्व खलअणे मेत्ती।
सा उण सुअणम्मि कआ अणहा पाहाणरेह व्व।।

८) अहिआअमाणिणो दुग्गअस्स छाहिं पअस्स रक्खंती।
णिअबंधवाणँ जूरइ घरिणी विहवेण एन्ताणं।।

९) णूमेंति जे पहुत्तं कुविअं दासा व्व जे पसाअंति।
ते व्विअ महिलाण पिआ, सेसा सामि व्विअ वराआ।।

१०) सो अत्थो जो हत्थे, तं मित्तं जं णिरंतरं वसणे।
तं रूअं जत्थ गुणा, तं विण्णाणं जहिं धम्मो।।

---

## सद्दत्था

**च्चिअ** – निश्चय सांगणारे अव्यय
**अत्थमणम्मि** – अस्त होत असतांना, नाश होत असतांना
**फुरंति** – स्फुरण पावतात, प्रकाशित होतात, प्रकट होतात
**हिअआइ** – हृदये
**णीसाहो** – फांद्या नसलेले
**झडिपत्तो** – पानगळ झालेला
**रसिओ** – रसिक, चांगल्या गोष्टींची आवड असणारा
**विण्णाणं** – विशेष ज्ञान
**पिअत्तणेण** – प्रेमभाव असल्याने, प्रेमळपणामुळे
**अआणमाणस्स** – न जाणणाऱ्याचे
**विप्पिअं** – वाईट, अप्रिय
**कीरंती** – करतांना
**खलअणे** – दुष्ट व्यक्तीबरोबर
**पाहाणरेहा** – दगडावरील रेघ
**दुग्गअ** – गरीब
**छाहिं** – छाया, तेज, सावली (इथे 'तेज')
**णूमेंति** – लपवितात
**पसाअंति** – प्रसन्न करतात
**वसणे** – संकटामध्ये
**मणंसिणो** – मोठे मन असणारा
**रइणो** – रवीचे, सूर्याचे
**समोणआइँ** – नम्र होतात
**सिहराइं** – शिखरे
**ताई** – त्यागी
**कुज्जो** – छोटा, खुजा
**महग्घे** – मौल्यवान, महनीय
**वेसत्तणं** – वैर, द्वेष
**छज्जइ** – शोभते, शोभून दिसते
**कुप्पइ** – रागवतो
**जंपिअं** – बोललेले
**उअए** – पाण्यामध्ये
**अणहा** – (दे.) अक्षत, स्थिर, न पुसली जाणारी
**अहिआअमाणिणो** – उच्च कुलाचा अभिमान असणाऱ्याच्या
**जूरइ** – खिन्न होते/होतो
**पहुत्तं** – मालकीहक्क, स्वामित्व
**अत्थो** – धन
**रूअं** – रूप

## सज्झाओ

### १ थोडक्यात उत्तरे लिहा.

१) सज्जनांच्या आणि दुर्जनांच्या मैत्रीमधील फरक सांगा.

२) दारिद्र्याच्या दुःखाचे वर्णन करा.

३) सज्जनांच्या गुणांचे वर्णन करा.

४) सेसा सामि व्विअ वराआ' - हे विधान स्पष्ट करा.

५) अर्थ, मित्र, रूप आणि विज्ञान यांचे स्वरूप स्पष्ट करा.

### २ खालील कृती करा.

१) पाठात आलेल्या क्रियापदांची सूची द्या.

२) पाठात आलेल्या नामे व सर्वनामांची यादी करा.

**३) खालील मराठी शब्दांसाठी या पाठातून प्रतिशब्द शोधा.**

सूर्य, अवस्था, स्फुरणे, हृदय, शिखर, फांदीरहित, झडलेले, विशेषज्ञान, प्रेमळपणा, शोभणे, क्षमा, सज्जन.

**४) खालील प्राकृत शब्दांचा माध्यम भाषेत अर्थ लिहा.**

तुंग, अत्थमण, फलसंपत्ती, रमणिज्ज, समत्थ, जाणंत, अआणमाण, लज्जिअ, अणहा, पाहाणरेहा.

५) मराठीमध्ये वापरात असलेले दहा देशी शब्द लिहा.

### ३ पुढील गाथा पूर्ण करून शुद्ध लिहा.

१) फलसंपत्तीअ ........................................................... ।
........................................................... व सिहराइं ।।

२) कीरंती ........................................................... ।
........................................................... व्व ।।

३) सो अत्थो ........................................................... ।
........................................................... जहिं धम्मो ।।

४) छज्जइ ........................................................... ।
........................................................... अआणमाणस्स ।।

५) जाएज्ज ........................................................... ।
........................................................... दरिद्दो अ ।।

❋❋❋